

फकरुद्दीन बेन्नूर परिचय :

महाराष्ट्र जस्टिस बदरुद्दीन तय्यबजी (काँग्रेसचे संस्थापक व तिसरे अध्यक्ष), जस्टिस एम.सी छागला, समाजवादी साथी यूसुफ मेहरअली, जस्टिस हिदायतउल्ला, समाजवादी साथी मोईनुद्दीन हारीस यांची या थोर मराठी मुसलमानांची जन्म व कर्मभूमी राहिलेली आहे. या विद्वानांनी केवळ महाराष्ट्राला राजकीय दिशा देण्याचं कार्य केलं नाही तर सामाजिक व सांस्कृतिक उत्थानासाठी उल्लेखनीय कार्य केलेलं आहे. या विभूतीपुरुषांचा वारसा १९७०च्या दशकात प्रा. फकरुद्दीन बेन्नूर यांनी पुढे नेला.

प्रा. बेन्नूर यांनी सामाजिक, सांस्कृतिक कार्यात अनेक मांनदंड स्थापित केले. राजकीय विश्लेषक म्हणून ते ख्यातकीर्त होते. त्याचप्रमाणे राष्ट्रीय एकात्मता, गंगा-जमुनी संस्कृती, हिंदू-मुस्लिम सलोखा, सुफी-संताचे विचार, फुले, शाहू, आंबेडकर, बहुसंख्य व अल्पसंख्याकाचा जमातवाद, राष्ट्रीय चळवळ, राष्ट्रवाद आदी विषयावर विपुल लेखन केलं आहे. तसंच प्रेषित, मार्क्स, गांधी, आगरकर, टिळक, रानडे, नेहरू, आज़ाद आदी राष्ट्रपुरुषाच्या राष्ट्रवादी विचारांचा वारसा मराठी मुस्लिम समुदायाला करून दिला. लोकशाही मूल्य व त्याची संविधानिक चौकट हे त्याच्या लेखनांची प्रमुख तत्वे होती.

मध्ययुगीन इतिहासाची मीमांसा धर्मकेंद्री न करता राजकीय स्वरूपाची असल्याचं उघडपणे सांगितलं. त्यांनी राष्ट्रीय चळवळीतील मुस्लिम नेत्यांच्या भारतीयत्वाच्या कल्पनेची पुनर्मांडणी केली. फाळणीचं राजकारण, त्यात होरपळणारे सामान्य मुस्लिम तथा हिंदूच्या व्यथा मांडल्या. भारतातील फाळणीला जबाबदार असलेल्या घटकांची राजकीय अवहेलना न करता त्यांना तत्कालीन परिस्थितीत समजून घेण्याची भूमिका आग्रहाने मांडली. आणीबीणीचे ते प्रखर विरोधक होते. त्यांनी सांप्रदायिक राजकारणाला सतत विरोध दर्शवला.

बेन्नूर व्यवसायाने प्राध्यापक होते. १९६५ साली ते लातूरच्या दयानंद कॉलेजमध्ये राजशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रूजू झाले. तत्पूर्वी ते पुण्यात अम्युनेशन फॅक्टरीत क्लार्क पदावर कार्यरत होते. कालांतराने सोलापूरच्या संगमेश्वर कॉलेजमध्ये रुजू झाले व तिथं सुमारे तीन दशके विद्यार्थी घडविण्याचं कार्य केलं. राजेद्र व्होरा, भा.ल. भोळे, यशवंत सुमंत, सुहास पळशीकर यांच्यासोबत त्यांनी राज्यशास्त्र परिषदा घेऊन आधुनिक राजकीय विचारांची मीमांसा महाराष्ट्रात घडवून आणली.

१९६७ साली त्यांचा सोलापूरला हमीद दलवाई यांच्याशी संपर्क आला. थोड्याच कालावधीत ते त्यांच्या संघटनेत सामील झाले व महिला प्रश्नांवर सक्रिय झाले. दलवाई हयात असेपर्यंत त्यांनी अनेक महत्त्वाच्या आघाड्यावर काम केलं. दरम्यानच्या काळात ते सोलापूरला युवक क्रांती दल, दलित पँथर, श्रमिक संघ आदी संघटनेत प्रभावीपणे कार्य केलं. दलित अत्याचार व युवकांचे प्रश्नावर आंदोलनात सहभाग नोंदवला, स्थानिक पातळीवर चळवळी घडवून आणल्या. त्याच काळात भारतात दंगलीचं राजकारण सुरू झालं होतं. त्यावेळी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून त्यांनी दंगली थांबवण्याचं धाडसी कार्य पार पाडलं. सोलापूर व परिसरात पन्नालाल सुराणा, अंत्रोळीकर आदींच्या सहकार्याने भविष्यात दगंली घडू नये म्हणून शांतता समिती स्थापन केली.

दलवाईच्या निधनानंतर मात्र त्यांची सत्यशोधक संघटना सोडली व स्वतंत्रपणे कार्य करू लागले. दुष्काळात त्यांनी तत्कालीन विधानसभा सदस्य गणपतराव देशमुख यांच्या सहकार्याने ठिकठिकाणी फिरून मदतकार्य केलं.

संघटना बांधणी

१९९० साली प्रा. बेन्नूर, विलास सोनवणे, अजीज नदाफ आदींनी एकत्र येऊन मुस्लिमांच्या साहित्यिक अभिव्यक्तीसाठी साहित्य परिषदेची स्थापना केली. मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून महाराष्ट्रात मराठी बोलणाऱ्या व लिहिणाऱ्या मुस्लिमांना एक केलं. २००८ सालापर्यंत आठ संमेलन घेऊन मुस्लिमांची भाषिक, प्रादेशिक व सांस्कृतिक ओळख सिद्ध केली.

मुस्लिमांच्या एकजिनसी मिथकाची धारण मोडून काढली. तब्बल ५० मुस्लिम मराठी सुफी-संताचे साहित्य व त्यांचे साहित्यिक कार्य प्रकाशात आणलं. प्रा. बेन्नूर एक उत्तम कथाकार होते. १९६५ साली त्यांनी आपली पहिली कथा लिहिली होती. त्यांच्या कवितांचा संग्रह २०१० साली दिलीपराजने प्रकाशित केला. त्यातील अनेक कवितेतून बेन्नूर यांची साहित्यिक अभिव्यक्ती जाणवत नाही तर मराठी

मुस्लिमांच्या व्यथा, कथांचं दर्शन होतं. त्यांनी राजकीय कविता आजही संयुक्तिक वाटतात. कथा, कविता, ललित, समीक्षा, अनुभव कथन, वैचारिक लेख, शोध निबंध आदी लेखन प्रकार त्यांनी हाताळले. परंतु त्यांना सर्वाधिक प्रसिद्धी व मान्यता वैचारिक लेखनातून मिळत गेली. साहित्य परिषदेच्या माध्यमातून त्यांनी डॉ. अलीम वकील, डॉ. मुहंमद आजम, हुमायून मुरसल, अब्दुल कादर मुकादम सारखे अनेक वैचारिक लेखक घड़वले व त्यांना एकत्र केलं. तसंच जावेद पाशा कुरेशी, मुबारक शेख, इलाही जमादार, अजीम नवाज राही आदी कविंना मंच मिळवून दिला.

मुस्लिम ओबीसी परिषद

प्रा. बेन्नूर यांनी १९९३ साली विलास सोनवणे, अजीज नदाफ यांच्या समवेत ओबीसी मुस्लिमांचं संघटन घडवून त्यांची संघटना बांधली. तत्पूर्वी राज्यात ओबीसीच्या राजकीय चळवळी सुरू झालेल्या होत्या. जनार्दन पाटील यांच्या नेतृत्वात ओबीसीची अधिकार चळवळ सुरू झाली होती. त्यांच्यासोबत शब्बीर अन्सारी कार्यरत होते. प्रा. बेन्नूर व सोनवणे यांनी पाटील व अन्सारींना त्याच्या परिषदेशी जोडलं. त्यातून एक वेगळा प्रयोग महाराष्ट्रात सुरू झाला.

प्रथमत मुस्लिमांची धार्मिक ओळख न ठसवता प्रादेशिक व जातीय सिद्ध केली गेली. त्यातून राजकीय व शैक्षाणिक हक्काची एक मोठी जनचळवळ उभी रहिली. अनेक शतकापूर्वी समतेच्या तत्त्वासाठी हिंदूमधील असंख्य मागास जातींनी इस्लाममध्ये धर्मांतर केलं. परंतु त्यांच्या जाती व व्यवसाय तेच राहिले. अशा तेली, तंबोळी, नदाफ, अत्तार, पिंजारी, मनियार व कास्तकार जातींना सामाजिक व राजकीय हक्क मिळवून देण्याची मोहीम प्रा. बेन्नूर यांच्या प्रयत्नाने सुरू झाली. पुढे या चळवळीत प्रसिद्ध अभिनेते दिलीपकुमार, जॉनी वाकर सारखी लोक जोडली गेली. त्यामुळे चळवळीला मोठा आकार येत गेला. त्यातून १९९५ साली राज्य सरकारने ओबीसीत नव्या मुस्लिम जातींचा समावेश केला व त्यांना शैक्षाणिक सवलती व आरक्षण देऊ केलं. १९९९ साली विधानसभेच्या सहा जागा ओबीसी मुस्लिमांना जाहिर झाल्या त्यातून विधानसभेवर दोन आमदार निवडून आले. मुस्लिम ओबीसी परिषद महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारणात मोठी दिशादर्शक चळवळ ठरली. प्रफुल्ल बिडवई सारख्या लोकांनी त्यांला देशभरात पोहोचवलं. त्यातून बिहारमध्ये १९९८ साली अली अनवर (दोनदा राज्यसभा खासदार) यांनी 'पसमांदा मुस्लिम महाज' नावाची दलित मुस्लिमांची संघटना

सुरू केली. त्यांना वैचारिक पाठबळ महाराष्ट्रातील मुस्लिम ओबीसी चळवळीने दिलं.

वर्तमान मोदी सरकारने पसमांदा मुस्लिमांचे राजकीय व शैक्षाणिक व सामाजिक अधिकार मिळवून देण्याची एक मोठी मोहिम सुरू केली आहे. त्याचे प्राथमिक श्रेय प्रा. बेन्नूर, सोनवणे, दिलीप कुमार व शब्बीर अन्सारींना जाते.

सातारा येथे सुरू झालेली बाबासाहेब आंबेडकर अकादमी बेन्नूर सरांच्या सांघटिक कार्याचा एक उत्तम नमूना होता. किशोर बेडकिहाड सारखे साथी त्यांना लाभले. त्यातून विचारवेध संमेलनाची एक मोठी मालिका राज्यात सुरू झाली. या संमेलनाचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक विचार अद्याप राज्यातील वैचारिक घटकांमध्ये आहे.

महाराष्ट्र मुस्लिम आरक्षण अधिकार चळवळ हीदेखील बेन्नूर यांच्या सांघटिक कार्याचं फलित होतं. या चळवळीने मुस्लिमांची सामजिक व प्रादेशिक आधारावर मांडणी करून आंबेडकरांनी दिलेला सामाजिक व राजकीय आरक्षणाची मागणी लावून धरली.

याशिवाय तमाम परिवर्तनवादी चळवळी, वैचारिक घटकांशी त्यांनी समन्वय साधून महाराष्ट्राला वैचारिक दिशा देण्याचा कार्य त्यांच्या हयातीत केलं. गांधी विचार हा त्यांच्या एकुण वैचारिक लेखनाची पाया राहिला आहे. राज्यातील आघाडीचे वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिकातून त्यांनी दीर्घकाळ लेखन केलं आहे. तसंच देशभरात विविध ठिकाणी त्यांनी व्याख्याने दिलेली आहेत. तसंच आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊन राज्याचे प्रतिनिधित्व केलेलं आहे.

प्रा. बेन्नूर अविवाहित होते. सामाजिक कार्यात व्यत्यय नको, यासाठी त्यांनी आजीवन अविवाहित राहण्याचा निर्णय घेतला होता. ऑगस्ट २०१८ला त्यांचं निधन झालं. जानेवारी २०१९ साली पुण्यात ‘सामाजिक समतेचा प्रवाह’ शीर्षकाने त्याच्या स्मृतिग्रंथाचं प्रकाशन पार पडलं. गंगा-जमुनी परंपरेवर आधारित या ग्रंथाचं संपादन डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांनी केलं आहे. त्यांच्या पश्चात त्यांचं एकुण लेखनकार्य संकलित करून ते पुस्तक रुपाने आणण्याची जबाबदारी प्रा. बेन्नूर विचार मंच आदी संस्थांनी घेतली आहे. नुकतीच जानेवारी २०२३ला त्यांची आत्मकथन ‘कुदरत’ प्रकाशित झालं आहे. या शिवाय (१) राष्ट्रवाद, सामाज्यवाद आणि इस्लाम (२) मुस्लिम मराठी साहित्यः एक दृष्टिक्षेप (३) भारतीय मुस्लिम आणि राष्ट्रीयत्व (४) इस्लामी तत्त्वज्ञान आणि मुस्लिम पुस्तके प्रकाशकाकडे आहेत.

त्यांची एकुण सर्व पुस्तके शब्द प्रकाशन, मुंबई प्रकाशित करीत आहे.

या शिवाय कलीम अज़ीम, डॉ. यूसुफ बेन्नूर सरांचे विविध लेख, भाषणं, शोधनिबंधाचं संकलन करत आहे. यथावकाश तेही पुस्तक रुपाने प्रकाशित करण्याचा मानस आहे. फाउंडेशन प्रा. बेन्नूर यांचा वारसा पुढे चालवत आहे. संस्था दखनी मुस्लिमांच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय योगदानावर विशेष संशोधन कार्य करीत आहेत. संस्थेने अद्याप १५ पेक्षा अधिक पुस्तके प्रकाशित केलेली आहे. संबंधित पुस्तके राज्यातील मान्यवर प्रकाशनाने बाजारात आणली आहेत. तसंच संस्था deccanquest.com नावाने मराठी आणि हिंदी अशा दोन स्वतंत्र वेबपोर्टलचं संचालन करते.

संस्थेने २०१९ सालापासून 'बेन्नूर स्मृति' पुरस्कार सुरू केला आहे. मुस्लिम समाजातील सामाजिक व सांस्कृतिक कार्यात सक्रिय व उल्लेखनीय योगदान देणाऱ्या राज्यातील लेखक, अभ्यासक व भाष्यकारांना हा सन्मान प्रदान केला जातो. आद्याप तीन सन्मान घोषित व वितरित झाले आहेत.

परिचयः

संपूर्ण नाव : फकरुद्दीन हजरत बेन्नूर
जन्म : २५ नोव्हेंबर १९३८, सातारा
मृत्यू : १७ ऑगस्ट २०१८, सोलापूर
शिक्षण : एम. ए. राज्यशास्त्र, एम. ए. इतिहास
व्यवसाय : संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर येथे व्याख्याता (१९६६ ते १९९८)

साहित्य निर्मिती

वैचारिक लेखसंग्रह, तुलनात्मक अभ्यास, कविता, समीक्षा, शोधनिबंध, व्यक्तिचित्रे, अनुवाद आदी विविध लेखन प्रकार

प्रकाशित ग्रंथ

१) भारतीय मुसलमानांची समाजरचना आणि मानसिकता (पुस्तिका) (१९९८)

२) भारतीय मुसलमानों की मानसिकता और सामाजिक संरचना (हिंदी) (१९९८)

३) हिंदुत्व, मुस्लिम आणि वास्तव (२००७)

४) आधुनिक भारतातील मुस्लिम विचारवंत (२००७)

५) गुलमोहर (कवितासंग्रह) (२०१०)

६) भारतीय मुसलमानांची समाजरचना आणि मानसिकता (विस्तारित आवृत्ती) (२०१२)

७) सुफी संप्रदायः वाङ्मय, विचार आणि कार्य (२०१६)

८) भारत के मुस्लिम विचारक (हिंदी) (२०१८)

९) हिंद स्वराज्य : एक अन्वयार्थ (२०१८)

१०) मुस्लिम राजकीय विचारवंत आणि राष्ट्रवाद (२०१८)

११) कुदरत (आत्मकथा) (२०२३)

प्रस्तावना व लेखन

* हिंदी, इंग्रजी व मराठीतील ५० पेक्षा अधिक संपादित ग्रंथामध्ये लेखन.

* अनेक मान्यवरांच्या गौरव ग्रंथ व स्मृतिग्रंथात विशेष लेख प्रसिद्ध.

* अनेक नवीन लेखकांच्या पुस्तकांची प्रस्तावना लेखन

* समाज प्रबोधन पत्रिका, आजचा सुधारक, परिवर्तनाचा वाटसरू, सत्याग्रही विचारधारा आदी मासिकातून नियमीत लेखन.

* दै. संचार, दै. लोकमत, दिव्य मराठी, महाराष्ट्र टाइम्स, सोलापूर समाचार आदी दैनिकातून लेखन.

शोधनिबंध

कर्नाटक विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ इत्यादी विद्यापीठात आधुनिक राज्यशास्त्र, समकालीन राजकारण, हिंदु-मुस्लिम प्रश्न, मुस्लिम राजकारण, सामाजिक समन्वय, सुफी संत परंपरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, आगरकर, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, छत्रपती शाहू महाराज व अन्य विषयावर तब्बल १५० हून अधिक शोधनिबंध सादर.

सामाजिक कार्य

* १९७० पासून मुस्लिम प्रबोधनाच्या चळवळीत सक्रीय.

* १९७० पासून मुस्लिम महिलांचे प्रश्न, हिंदु-मुस्लिम समस्या, राजकारण, जमातवाद, हिंदु-मुस्लिम सलोखा, मुस्लिम मराठी साहित्य इत्यादी संबधी लेखनाला सुरुवात.

* जागतिकीकरण, सामाज्यवाद, अरब जग, आधुनिक भारताचे राजकारण, मुस्लिम मराठी साहित्य इत्यादी विषयावर सातत्याने लेखन.

* मुस्लिम महिलांचे अधिकार, हिंदु-मुस्लिम समन्वय, मुस्लिम राजकारण,

जमातवाद, हिंदु-मुस्लिम सौहार्द इत्यादी विषयावर महाराष्ट्रभर दौरे व भाषणे.

* दलित पँथरच्या स्थापनेपासून सोलापूर शहर व जिल्ह्यात पँथरच्या बरोबरीने दलित अत्याचारविरोधात लढा आणि चळवळीत सक्रीय. सोलापूर जिल्ह्यात आंबेडकरी चळवळीच्या प्रसाराचे प्रयत्न. सत्यशोधन तथा शांतता समित्यांचे नेतृत्व.

* अॅट्रासिटी व दलित प्रश्नांवर सातत्याने लिखाण, डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय विचारांवर विविध दैनिके, नियतकालिके, मासिके, साप्ताहिकांमधून लिखाण.

* विषमता निर्मूलन चळवळीच्या प्रचारासाठी महाराष्ट्र व देशभर दौरे.

* १९८४ पासून डॉ. असगरअली इंजिनिअर यांच्या समवेत 'हिंदु-मुस्लिम एकता' चळवळीत सातारा, सांगली, इचलकरंजी, गुलबर्गा, लातूर येथे मेळावे आणि चर्चासत्र आयोजित.

* लोकजीवन अकादमी, हुतात्मा अकादमी, समाजवादी प्रबोधिनीतर्फे चर्चासत्रांचे आयोजन.

* १९९० साली अखिल भारतीय मुस्लिम साहित्य परिषेदेची स्थापना, संस्थापक व कार्यकारी अध्यक्ष, २००२ पर्यत ७ मुस्लिम मराठी साहित्य संमेलने आयोजित

* १९९२ साली मुस्लिम ओबीसी चळवळीची सुरुवात-संस्थापक, १९९४ पासून महाराष्ट्रभर चळवळीचा प्रसार

स्थापना

* मुस्लिम मराठी साहित्य परिषद- सोलापूर-(१९९०)

* ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी चळवळ (१९९२)

* डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा

* महाराष्ट्रीयन मुस्लिम अधिकार आंदोलन (२०१५)

* इतिहास पुनर्लेखन समिती (२०१४)

सन्मान

* सदस्य- महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ (१९९३-१९९५)

* तज्ज्ञ सदस्य- महाराष्ट्र गॅझेटियर विभाग (२००० ते २००४)

* अध्यक्ष - राज्यशास्त्र परिषद १९९४ ते १९९६ शिवाजी विद्यापीठ,

कोल्हापूर

* अध्यक्ष- महाराष्ट्र राज्यशास्त्र परिषद, १९९४ सांगली

* अध्यक्ष : पहिले सर्वधर्मीय साहित्य संमेलन, वरोरा, जि. चंद्रपूर (२०१२).

* कराची (पाकिस्तान) येथे घेण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरावरील चर्चासत्रासाठी आमंत्रण व सहभाग (एप्रिल-२००७).

* आंतरराष्ट्रीय निरीक्षक : नेपाळमधील २००८ सालच्या लोकशाही पद्धतीच्या निवडणुकीची पाहणी करून भारत सरकारला अहवाल सादर. ही नेमणूक आंतरराष्ट्रीय समितीतर्फे करण्यात आली होती.

'संशोधन व्यक्ती' म्हणून आमंत्रित

* कर्नाटक विद्यापीठ

* राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर

* शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

* डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

* सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

पुरस्कार

* छत्रपती शाहू महाराज पुरस्कार, कोल्हापूर

* 'हिंदुत्व, मुस्लिम आणि वास्तव' या पुस्तकाला महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचा २०१०चा डॉ. सूर्यकांत घुगरे पुरस्कार

**

टिपण लेखन :

कलीम अज़ीम, पुणे

मेल : kalimazim2@gmail.com